

# १ मे, चलो नंदुरबार

१ मे १९८१ रोजी नंदुरबारला श्रमिक स्त्री-मुक्ती परिषद झाली. शहादा, तळोदा, नंदुरबार, धुळे, नागपूर, पुणे, मुंबई अशा विविध भागातून सुमारे दीड हजार स्त्रिया परिषदेला आल्या होत्या. विशेष म्हणजे बंगाल, मध्यप्रदेश व गुजराथ येथूनही स्त्री प्रतिनिधी मुद्दाम परिषदेसाठी आल्या होत्या. परिषद घेण्याचा पुढाकार शहादा विभागातील श्रमिक संघटनेतील स्त्री-मुक्तीचे काम करणाऱ्या स्त्रियांनी घेतला होता. शहर व ग्रामीण विभागातील स्त्रियांनी एकत्र यावे व त्यांना एकमेकींच्या समस्या समजाव्यात हा हेतू परिषदेमागे होता. 'श्रमिक-स्त्री' हा शब्द व्यापकपणे मांडला गेला होता. कारखान्यात असो वा शेतात, शाळेत असो वा कचेरीत, घराबाहेर कष्ट करणारी असो वा स्वयंपाकघरात रांधणारी असो, कोणतीही स्त्री ही श्रमिक स्त्रीच असते. कष्ट करणे, श्रम करणे, हा कोणत्याही स्तरातील बहुसंख्य स्त्रियांच्या आयुष्याचा अटळ भाग असतो. हे लक्षात घेऊनच परिषदेला 'श्रमिक स्त्री-मुक्ती परिषद' म्हटले होते. ही व्याप्ती लक्षात घेऊनच परिषदेस ग्रामीण व शहरी विभागातून बहुसंख्येने स्त्रिया याव्यात असा प्रयत्न करण्यात आला. अर्थात काही प्रमाणात हा हेतू सफलही झाला. परिषद एकाच दिवसाची होती, फारशी भाषणे न ठेवता जरा वेगळ्या पद्धतीने कार्यक्रमाची आखणी करावी असे ठरले. छोट्या नाटिकांद्वारे शहरी तसेच ग्रामीण स्त्री जीवनातील महत्त्वाच्या समस्या मांडाव्यात असे निश्चित झाले. या नाटकांवर दुपारी गटवार चर्चा करावी मग नंदुरबार शहरात एक मिरवणूक. शेवटी जाहीर सभा. रात्र मात्र खास आदिवासी व इतर समूह नृत्यांसाठी राखून ठेवली होती. या नियोजित कार्यक्रमानुसारच सर्व कार्यक्रम पार पडला. दुसऱ्या दिवशी म्हणजे २ मे रोजी कार्यकर्त्या स्त्रियांनी परिषदेवर व पुढील कार्यक्रमावर चर्चा केली.

सकाळी १० वाजेपर्यंत स्त्री मुक्तीची गाणी म्हणत, घोषणा देत खेड्यापाड्यातून स्त्रिया नंदुरबारला येऊन जमल्या. धडाकेबाज गाण्यांनी परिषदेला सुरवात झाली. 'चला बाई चला एकजूट करा, स्त्री मुक्तीचा देऊ लढा, अग वेणूबाई कशाला रहाते, दबून दबून चल मोर्चावरी—' अशा गाण्यांनी वातावरणात उत्साह संचारला. तसेच, परिषदेसाठी नंदुरबारला चला, पहिला मुक्काम, दुसरा मुक्काम अशा प्रत्येक मुक्कामाच्या गावाची नावे असलेली आदिवासी भाषेतील अर्थपूर्ण आशय असलेली गाणी विशेष ढंगांनी म्हटली गेली. नंतर आदिवासी भाषेत ग्रामीण समस्येवरील नाटक स्त्री-कलाकारांनी सादर केले.

संघटनेशी संबंधित अशा पुरुषाचा आपल्या पत्नीशी असलेला व्यवहार व संघटनेशी संबंध नसणाऱ्या पुरु-

षाचा पत्नीशी असलेला व्यवहार यातला फरक ग्रामीण नाटिकेतून स्पष्ट केला होता.

तर लग्न, नोकरी, हुंडा, सासुरवास, मूल न होणे अशा अनेक प्रश्नांनी वेढलेली स्त्री हा शहरी नायिकेचा मुख्य विषय होता.

'खुर्ची का मिर्ची, जाशील कशी' अशा सामुहिक खेळांद्वारे परंपरेचे भक्कम वर्तूळ दाखवण्यात आले.

अशा परिस्थितीत त्या स्त्रीने काय करावे? हा प्रश्न मुद्दाम चर्चेसाठी पुढे आला. यानंतर जेवणाची सुट्टी झाली. दुपारी गटवार चर्चेमध्ये या नाटकांवर चर्चा करण्याचे जाहीर झाले.

एवढ्या मोठ्या संख्येने हजर राहिलेल्या स्त्रियांचे गट पाडणे जरा कठीण वाटत होते. परंतु फारसा गोंधळ न होता वा वेळही न जाता स्त्रिया विविध खोल्यांमध्ये गटवार चर्चेमध्ये विभागल्या गेल्या. गटवार चर्चा करण्यास जास्त सुलभ जावे म्हणून काही मुद्दे चर्चा घेणाऱ्यांपुढे प्रथम मांडण्यात आले. असे असले तरी जास्तीत जास्त उत्स्फूर्तपणे चर्चा व्हावी असा प्रयत्न करण्यात आला.

गटवार चर्चेत प्रामुख्याने शहर विभागातील स्त्रिया व ग्रामीण स्त्रिया यांच्यात भाषेच्या भिन्नतेमुळे संवाद करण्यात बऱ्याच अडचणी आल्या.

चर्चेसाठी आदिवासी स्त्रियाच बहुसंख्येने असल्यामुळे त्यांच्या जीवनातील प्रश्नांवरच चर्चा केन्द्रित झाली.

गटवार चर्चेनंतर नंदुरबार शहरातून एक मोठी मिरवणूक काढली गेली. मिरवणुकीत पुरुष कार्यकर्तेही सहभागी होते. 'स्त्री मुक्ती झिंदाबाद,' 'क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले झिंदाबाद–' 'नही सहेंगे नही सहेंगे। अत्याचार नही सहेंगे–' अशा विविध घोषणा व गाणी ही मिरवणुकीत म्हटली गेली. परिषदेचे फलकही मिरवणुकीत घेण्यात आले होते.

नंतर मिरवणुकीचे रूपांतर जाहीर सभेत झाले. सभेच्या अध्यक्षा श्रीमती कुमुद पावडे होत्या. श्रीमती भूरीबाई शेमले, प्रा. विद्या पाटील, श्रीमती गुड्डी मालवी, श्रीमती विजया चौक, श्रीमती जजूबाई गावी श्रीमती मेक ऑनदेर प्रभृतीची सभेत भाषणे झाली.

सरतेशेवटी नंदुरबारच्या नीला मुळे यांनी आभार मानले. सर्व प्रतिनिधी, अर्थ–सहाय्यक व उपस्थितांना त्यांनी धन्यवाद दिले.

रात्रीच्या जेवणानंतर त्या शाळेच्या आवारात ढोलाचा आवाज दुमदुमला. आदिवासी स्त्रियांच्या हातात हात घालून शहरी स्त्रियांनीही सामुदायिक नृत्याचा आनंद रात्री उशीरापर्यंत लुटला.

दिनांक २ मे, १९८१ रोजी कार्यकर्त्या स्त्रियांनी एकूण परिषदेचा आढावा घेतला. काही प्रश्नांवर चर्चा केली. नजिकच्या भविष्यकाळात अशा प्रकारच्या श्रमिक स्त्री परिषदा कोठे व कशा घेता येतील यावरही विचार झाला.

या परिषदेतून काय साधले? असा प्रश्न स्त्री कार्यकर्त्यांच्या मनात उपस्थित होणे शक्य आहे. किंबहुना अशा परिषदातून निश्चित असा आशय बहुसंख्य स्त्रियांपर्यंत पोहोचणे शक्य आहे का, हेही बघणे आवश्यक ठरते. या संदर्भात नंदुरबार परिषदेचा अनुभव तपासून बघणे स्तुत्य ठरेल. तसे पाहिले तर गेल्या पाच सहा वर्षात स्त्रियांच्या वेगवेगळ्या पद्धतीच्या परिषदा ठिकठिकाणी होताना दिसत आहेत. अनेक वेळा या परिषदा कार्यकर्त्या स्त्रियापर्यंत मर्यादित राहिल्या आहेत. त्या दृष्टीने नंदुरबार परिषदेचे स्वरूप बऱ्या प्रमाणात 'मेळावा' यासारखे होते. शहादा विभागातील आदिवासी, शेतमजूर स्त्रियांना बहुसंख्येने एकत्र आणण्याचे काम श्रमिक संघटनेच्या, स्त्री-मुक्ती शाखेने केले होते. म्हणजेच थोड्या प्रमाणात संघटनेत असलेल्या किंवा नसलेल्याही बहुसंख्य स्त्रिया परिषदेसाठी आलेल्या होत्या. शहर विभागातूनही अशाच प्रकारे स्त्रिया परिषदेला याव्यात अशी अपेक्षा होती पण ती पूर्ण होऊ शकली नाही. जमलेल्या सर्व स्त्रिया कोणत्याही एका पक्षाच्या किंवा अगदी एका विचारसरणीच्यासुद्धा असण्याची गरज परिषदेत येण्यासाठी नव्हती. केवळ स्त्री वा श्रमिक स्त्री असणे या भूमिकेवरूनच स्त्रिया एकत्र आल्या होत्या. यामुळे स्त्री अत्याचाराचे काही महत्त्वाचे प्रश्नच फक्त चर्चिले जा

हे साहजिकच होते. कोणतीही एखादीच मागणी लावून धरायची नसल्याने परिषदेत केवळ स्त्रियांचे म्हणून असलेलें प्रश्नच चर्चिले गेले. भाषिक अडचणही पुढे आली होती. तरीसुद्धा पुढील काही कारणांमुळे परिषदेला महत्त्व प्राप्त होते.

अजूनही संकल्पना म्हणूनही स्त्री-मुक्ती ही कल्पना लोकमानसात रुजलेली नाही. वारंवार घडणाऱ्या अशा परिषदांतून ही कल्पना लोकांपर्यंत जाऊ शकते. किंबहुना स्त्रियांचे म्हणून काही स्वतंत्र प्रश्न आहेत ही गोष्टही लोकमानसात रुजू शकते.

एका विशिष्ट कारणासाठी एकत्र आलेल्या बहुसंख्य स्त्रियांना आपल्या एकत्रित ताकदीची जाण निर्माण होण्यासाठीही परिषदेचे महत्त्व वाटते. एकत्रितपणे 'स्त्री' म्हणून असलेले प्रश्न चर्चिले जाणे याचा उपयोग निश्चितच आहे.

एखाद्या चित्रपटाद्वारे वा स्लाईड शो द्वारे अल्पकाळ एकत्र येऊ शकणाऱ्या बहुसंख्य स्त्रियांपुढे नवीन प्रश्न वा नवीन विचार मांडता येतो व यातून त्यांच्या विचारांना चालना मिळणे शक्य होऊ शकते. कोणतीही ज्वलंत समस्या वा इश्यू तावडतोबीची म्हणून पुढे नसतानाही एकत्र आल्याने, सततपणे बोचणाऱ्या प्रश्नाबाबत परिवर्तनशील होण्यास मदत होऊ शकेल. तसेच संघटीतपणाची जागृकता जिवंत ठेवायलाही मदत होईल.

कार्यक्रमाचे स्वरूप थोडे फार 'जत्रेसारखे' झाले तरी रोजच्या कामाच्या चक्रातून बाजूला होऊन एकत्रितपणातून मिळवलेला हा आनंद एकूण चळवळ पुढे सरकवण्यास विधायकच ठरू शकेल.

असे असले तरी एकूणच परिषदांची आखणी जास्त कल्पकतेने व बांधीवपणे करण्यासाठी कार्यकर्त्यांना अजून प्रयत्नशील व्हावे लागेल.

नवा आशय लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी भाषणाव्यतिरिक्त, गटवार चर्चा, छोटी नाटके, परिसंवाद, अभिरूप न्यायालयं यासारखे नवे प्रकार विचारात घ्यावे लागतील. स्थानिक पातळीवर अशी शिबीरे घेतल्यास नक्कीच नवे प्रश्न व कार्यक्रमही गतीमान होण्यास मदत होईल.

**मुक्ता मनोहर**

---

( पान २२ वरून पुढे चालू )

'ज्या देशातीय वर्गीय भेद नष्ट झाले आहेत, त्या देशातील स्त्री ही आर्थिक किंवा सामाजिक दृष्टचा अबला नाही म्हणूनच कुटुंबनियोजनाचा प्रचार आर्थिक दृष्टीकोनातून न होता, कुटुंबातील कंटाळवाण्या कामापासून मुक्तता देण्याचे एक साधन असाच होतो.'

म्हणजेच क्यूबाच्या समाजवादी राष्ट्रात कुटुंबनियोजनाला महत्त्व मिळते, पण कुटुंबनियोजनाचा विचार स्त्रियांच्या संदर्भात होतो. देशाचा आर्थिक विकास सर्वांसाठी असतो. माणसांची संख्या वाढली अगर कमी झाली, तरी आलेल्या सर्व लोकांना सामावून घेऊ असा विश्वास या देशाला वाटतो.

भारतातील परिस्थितीच्या संदर्भात क्यूबामधील कुटुंबनियोजनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन किती आगळा व वेगळा वाटतो नाही का ?

**सरिता आवाड**

